ISSN : 2231 4377

SAKSHAM SAMIKSHA

त्रैमासिक


# सक्षम समीक्षा

मराठी भाषा - वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

वर्ष ८ वे अंक पहिला

एप्रिल-मे-जून २०१८

संपादक : प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन



## यशवंत मनोहर साहित्य विशेषांक

Scanned by CamScanner




# अं|त|रं|ग


- यशवंत मनोहरांची भाषणे : राष्ट्राच्या क्रांतिकारी पुनर्रचनेचा वैश्विक प्रयोग — प्रा. डॉ. अनमोल शेंडे .............. ५
- तत्त्वज्ञ कवींचे संवादी प्रवासवर्णन : 'स्मरणांची कारंजी' — प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर .......... १३
- अंधाराच्या छावण्या उद्ध्वस्त करणारी कविता : बाबासाहेब — प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे ........ १६
- समाजपरिवर्तनासाठी लढणारी कविता : उत्थानगुंफा — प्रा. डॉ. संजय पाटील ............ २४
- मराठी साहित्य समीक्षेतील डॉ. यशवंत मनोहरांचे योगदान — प्रा.डॉ. सुभाष आहेर ............ २९
- डॉ. यशवंत मनोहर यांच्या साहित्य लेखनातील विविध पैलू — प्रा. रश्मी नन्नावरे ................ ३२
- यशवंत मनोहर यांच्या लेखनातील वैचारिकता — प्रा. डॉ. शहाजी ज. पाटील........ ३५
- युगसाक्षी प्रतिभावंत : डॉ. यशवंत मनोहर — प्रा. डॉ. सुनील चंदनशिवे ......... ३७
- जीवनायन : समग्र क्रांतीचा सिद्धान्त — प्रा. डॉ. सर्जनादित्य मनोहर........ ४१
- वंचितांच्या महामाता रमाई मी सावित्री! मी यशोधरा — प्रा. डॉ. संजय कांबळे............ ४६
- डॉ. यशवंत मनोहरांची जडवादी समीक्षा — प्रा. डॉ. अशोक कांबळे........... ५४
- इहवादी विचारवंत : डॉ. यशवंत मनोहर — प्रा. डॉ. प्रकाश राठोड............ ५८
- यशवंत मनोहर यांच्या कवितेची भाषा — वैशाली धनविजय ................ ६१
- "'जागतिकीरणातही युगांतरा'ची भाषा बोलणारी यशवंत मनोहरांची कविता" — प्रा. डॉ. सुरेश वर्धे ................ ६५
- येरल्याचे मनोहर काव्यांगण — प्रमोद वाळके..................... ७२
- कालचा पाऊस : एक प्रतिमाकलन — प्रा. डॉ. महेंद्र भवरे................ ७६
- 'मूर्तिभंजना'तील प्रेमानुभूतीचे स्वरूप — डॉ. युवराज सोनटक्के ............ ७८
- अमृत प्रतिभेचा बुद्धिवादी शिक्षक डॉ. यशवंत मनोहर — प्रा. डॉ. हेमंत खडके .............. ८२
- उत्थानगुंफा : एक समीक्षात्मक अध्ययन — प्रा. रजनी कानेकर-जोगे.......... ८४
- डॉ. यशवंत मनोहर विज्ञाननिष्ठ सूर्यसंस्कृतीचे निर्माणक — प्रा. डॉ. प्रभंजन चव्हाण .......... ८६
- 'युगांतर' : विराट काळपटाला शब्दांतून मांडणारा — आश्लेषा महाजन ................ ८९
- मानवतेचे धगधगते सौंदर्य खुलविणारी कविता : युगमुद्रा — डॉ. अक्रम ह. पठाण .............. ९५
- साहित्याचे सौंदर्य आणि सौंदर्याची संस्कृती डॉ. यशवंत मनोहर यांची मुलाखत — प्रा. डॉ. शैलेश त्रिभुवन.......... १०२
- हुकुमशाही व्यवस्थेविरुद्ध उठाव करणाऱ्या कविता मनोहरांच्या कवितेचे नवे वळण — प्रा. डॉ. प्रमोद मुनघाटे .......... १०९
- सतत ताजे भान दृढ करणारा कवी : डॉ. यशवंत मनोहर — डॉ. केशव देशमुख ............ १११




Scanned by CamScanner

# मराठी साहित्य समीक्षेतील डॉ. यशवंत मनोहरांचे योगदान



प्रा.डॉ. सुभाष आहेर
रयत शिक्षण संस्था राधाबाई काळे महिला महाविद्यालय अहमदनगर.
मो. ९८५०२०९३७२
subhashaher@Gmail.com

साहित्याचे लेखन करणे सोपे असते, पण त्या साहित्याची समीक्षा करणे अवघड असते, असे नेहमी म्हटले जाते. साहित्यावर टीका करणारा टीकाकार एवढयाच सीमित अर्थाने समीक्षकाकडे बघता कामा नये. साहित्याचे आकलन-आस्वाद व मूल्यमापन करणे या गोष्टी साहित्याच्या समीक्षेत अपेक्षित आहे. समीक्षा ही खऱ्या अर्थाने सम्यक दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. समीक्षेत नुसतीच एकांगी टीका किंवा स्तुती अपेक्षित नाही. समीक्षकाजवळ अभ्यासूवृत्ती, तटस्थवृत्ती असणे आवश्यक आहे. समीक्षकाच्या ठायी आपपरभाव नसावा. मराठी साहित्य समीक्षेच्या संदर्भात दुर्देवाने अभ्यासपूर्ण समीक्षा कमी होत आहे.

**मराठी साहित्याची समीक्षा** : लेखकाची कलाकृती प्रसिद्ध झाल्यानंतर त्या कलाकृतीची चिकित्सा समीक्षकाकडून केली जाते. अनेकदा त्या कलाकृतीचा समकालीन परिस्थितीशी, तत्कालीन जीवनव्यवहारांशी अनुबंध तपासला जातो. वेगवेगळया दृष्टिकोनातून, अभ्यासपध्दतीतून त्या कलाकृतीची समीक्षा केली जाते. ''प्रस्थापित साहित्याचे गंभीरतेने पुनर्मूल्यांकन करणे, अधिक विस्तृत पण समर्पक वाटणाऱ्या नव्या साहित्य-संकल्पनांचा शोध घेणे, नवसाहित्याशी सुसंगत अशा स्फुट समीक्षा-विचारांची सूत्रबध्द मांडणी करणे आणि त्याच्या आधारे जुन्या किंवा नव्या साहित्यकृतीच्या जाणिवा-उणिवांची, सामर्थ्याची अथवा मर्यादांची उकल करणे ही आजच्या समीक्षेची महत्त्वाची दिशा होय.''१ साहित्यकृतीची सर्वांगीण तपासणी करुन त्या कलाकृतीचे त्या साहित्यप्रकारात स्थान निश्चित करणे येथे अपेक्षित आहे. प्रत्येक कलाकृतीचे मूल्यमापन अथवा समीक्षा ही सारख्याच मूल्यकसोटीद्वारा करता येत नाही. वाङ्मयीन समीक्षा ही एक तारेवरची कसरत आहे. समीक्षा म्हणजे वाङ्मय रहस्याचा शोध होय. मराठी साहित्याचा विविध अंगाने अभ्यास करुन सुरुवातीला काही समीक्षकांनी समीक्षा केली. का. बा. मराठे, बा. अ. भिडे, वि. ल. भावे, श्री. ना. बनहट्टी, द. के. केळकर, के. ना. वाटवे, रा.श्री. जोग, श्री. के. क्षीरसागर, कुसुमावती देशपांडे, शं. दा. पेंडसे आदी समीक्षकांचे लेखन महत्त्वपूर्ण आहे. १९४० च्या आसपास मर्ढेकरयुगातच नवसाहित्याच्या अनुरोधाने नवसमीक्षेचा उदय झाला. ''मर्ढेकरपूर्वकाळातील मराठी साहित्यसमीक्षा बव्हंशी बहिर्मुख आणि तंत्रवादी होती. त्यातील कलाविषयक किंवा जीवनविषयक विचार ढोबळ किंवा ठिसूळ स्वरुपाचे होते. वृत्तितः ही समीक्षा पढिक किंवा पंतोजीवृत्तीची होती. तिचे वळण बालबोध होते.''२ गो.म. कुलकर्णी यांच्या या मतामध्ये सत्यता आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सौंदर्यशास्त्राची विविधांगी तात्त्विक चर्चा करणाऱ्या ग्रंथाची उपलब्धी झाली. बा. सी. मर्ढेकर, रा.भा. पाटणकर, वि. ना. ढवळे, अशोक केळकर, रा. भि. जोशी, गो. वि. करंदीकर, भालचंद्र नेमाडे, म. द. हातकणंगलेकर, दिलीप चित्रे, डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. श्री. रं. कुलकर्णी, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. प्रभाकर मांडे आदींनी आपल्या अभ्यासक्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले. साहित्य आणि साहित्येतर कला यांचे परस्परसंबंध शोधण्याचा प्रयत्न अशोक रानडे, द.ग. गोडसे, माधव आचवल, आदी अभ्यासकांनी केला. र.पं. कंगले, ग.त्र्यं. देशपांडे, गो. के. भट यांनी संस्कृत साहित्यशास्त्राची नव्या दृष्टिकोनातून मांडणी केली. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्याचेही संशोधन व समीक्षा या काळात सुरू झाली.

**दलित साहित्याची समीक्षा** : १९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य या साहित्यप्रवाहांचा उदय झाला. या प्रवाहांच्या निर्मितीस अनेक

"समीक्षा ही खऱ्या अर्थाने सम्यक दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. समीक्षेत नुसतीच एकांगी टीका किंवा स्तुती अपेक्षित नाही. समीक्षकाजवळ अभ्यासूवृत्ती, तटस्थवृत्ती असणे आवश्यक आहे. समीक्षकाच्या ठायी आपपरभाव नसावा. मराठी साहित्य समीक्षेच्या संदर्भात दुर्देवाने अभ्यासपूर्ण समीक्षा कमी होत आहे."



Scanned by CamScanner